महाराष्ट्र शासन
तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार परभणी यांचे कार्यालय
आस्थपना विभाग

दुरध्वनी क्रः- 02452-(222711) ईमेलः-tahsildarparbhani@gmail.com

---

जा.क्र.2023 /आस्था/को/पदभरती/कावि- दिनांकः- 21.07.2023

प्रति,

जिल्हा सुचना विज्ञान केंद्र,
जिल्हाधिकारी कार्यालय परभणी.

विषय :- कोतवाल पदभरती-२०२३
तालुका परभणी ची जाहीरात www.parbhani.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे बाबत.

संदर्भ :- मा.जिल्हाधिकारी परभणी यांचे आदेश जाक्र.२०२३/अ-२/आस्था-१/सिआर-०४ दि.२१.०७.२०२३

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, परभणी तालुक्याची कोतवाल पदभरती-२०२३ बाबत कार्यक्रम पत्रिका प्रसिध्द करण्यात आली असून दिनांक.३१.०७.२०२३ रोजी एकाच दिवशी सदरील जाहीरात प्रसिध्दी करण्याबाबत आदेशीत करण्यात आले आहे.

करित उपरोक्त प्रमाणे जाहीरात यासोबत देण्यात येत असून आपण सदरील जाहीरात दिनांक.३१.०७.२०२३ रोजी आपल्या www.parbhani.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

सोबत- जाहीरात ०१ पान

सदस्य सचिव तथा
तहसिलदार परभणी

प्रतिलिपी :-

०१.मा.जिल्हाधिकारी परभणी यांना माहितीस्तव सविनय सादर.
०२.मा. अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी परभणी यांना माहितीस्तव सविनय सादर.

सदस्य सचिव तथा
तहसिलदार परभणी

कोतवाल पदभरती जाहिरात-2023

जाहिरात जा.क्र.2023/आस्था/कोतवाल पदभरती/सिआर- दिनांक.31.07.2023

महाराष्ट्र महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र.केओटी-2012/प्र.क्र.432/ई-10 दिनांक 05 सप्टेंबर,2013 व शासन निर्णय क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.17/ई-10 दि.17 मे, 2023 अन्वये परभणी तहसिल कार्यालय यांचे आस्थापनेवरील अवर्गीकृत कोतवाल संवर्गामधील रिक्त पदांच्या पदभरतीसाठी खालील प्रमाणे प्रवर्ग निहाय उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**कोतवाल प्रवर्गातील रिक्त पदांचे आरक्षण (एकत्रित मानधन 15000/- रु दरमहा)**

| अ.क्र | जातीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण (महिला) | समांतर आरक्षणा शिवाय भरावयाची पदे | एकुण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| 1 | अनुसूचित जाती | 1 | 2 | 3 |
| 2 | अनुसूचित जमाती | 1 | 1 | 2 |
| 3 | विजा (अ) | 0 | 1 | 1 |
| 4 | भज (ब) | 0 | 1 | 1 |
| 5 | भज (क) | 0 | 1 | 1 |
| 6 | विमाप्र | 0 | 1 | 1 |
| 7 | इमाव | 1 | 3 | 4 |
| 8 | अर्थिक दृष्टया मागास प्रवर्ग | 1 | 1 | 2 |
| 9 | खुला | 4 | 8 | 12 |
| एकुण | | 8 | 19 | 27 |

टिपः-

1. पदांच्या एकुण संख्येमध्ये व आरक्षणात वाढ किंवा घट होवु शकते.
2. 30% आरक्षणासाठी पात्र महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या प्रवर्गातील पात्र पुरुष उमेदवारानधुन पदे भरण्यात येतील.
3. काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगित झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही.
4. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण, सामाजिक आरक्षण यात बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे, भरती प्रक्रियेत बदल करणे, भरती प्रक्रीया संदर्भात उद्भवणारे वाद, अन्य कोणतीही तांत्रीक /प्रशासकीय अडचण / तक्रारी बाबतचे सर्व अधिकार निवड समिती स्वतःकडे राखुन ठेवीत आहे. उक्त कोणत्याही बाबींवर सदर समितीचा निर्णय अंतीम राहील.

**-: अटी व शर्ती :-**

**1. शैक्षणिक अर्हता**

1.1 उमेदवार हा किमान 4 थी पास (उत्तीर्ण) आसावा व त्याला मराठी लिहिता वाचता येणे आवश्यक आहे.

2. वयोमर्यादा

2.1 उमेदवाराचे वय दिनांक 31.07.2023 रोजी 18 ते 40 या वयोगटातील असावे.

2.2 वय वर्ष 18 वर्षाखालील व 40 वर्षावरील उमेदवार अपात्र ठरतील.

2.3 कोतवाल हे पद अवर्गीकृत असल्यामुळे (वर्ग-4 संवर्गात मोडत नसल्यामुळे) दिव्यांग, प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त, अशंकालीन, खेळाडू व माजी सैनिक इत्यादीसाठी देण्यात आलेली वयोमर्यादेतील शिथीलता तथा समातंर आरक्षण लागु नाही.

3. उमेदवार परभणी तालुक्याचा रहिवाशी असणे आवश्यक आहे. उमेदवाराने रहिवासी असल्याबाबतचे (रेशनकार्ड/निवडणुक ओळखपत्र/ आधारकार्ड /तहसिलदार यांनी निर्गमित केलेले रहिवासी प्रमाणपत्र) यापैकी एक पुरावा जोडणे आवश्यक आहे. संबधित रहिवासी पुरावा स्वसाक्षांकित करावा.

4. निवड झालेल्या उमेदवारांनी शारिरिक क्षमतेबाबत सक्षम अधिकारी यांचेकडील वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करावे लागेल व चारित्र्यबाबत प्रमाणपत्र / पडताळणी देणे बंधनकारक राहील.

5. सदर जाहिरातीन्वये करण्यात येणारी भरती संपूर्ण तालुका काही घटक गृहित धरून करण्यात येत असल्यामुळे निवड होण्या-या उमेदवाराचा नियुक्तीसाठी त्यांचे राहण्याच्या ठिकाणचा कोणताही विचार न करता तालुका अंतर्गत रिक्त असलेल्या कोणत्याही ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल व तालुका अंतर्गत बदलीस तो पात्र राहील.

6. उमेदवाराची (कोतवाल) नियुक्ती केवळ तात्पुरत्या कालावधीसाठी राहील. सदरची नियुक्ती अस्थाई तत्वावर असेल.

7. कोतवाल पद अवर्गीकृत असल्यामुळे सेवानिवृत्तीविषयक लाभ मिळणार नाहीत.

8. मागासवर्गीय उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांनी दिलेले मूळ जात प्रमाणपत्र अंतिम निवडीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. निवड होणाऱ्या मागासवर्गीय घटकातील उमेदवारांना महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक 2011/प्र.क्र.1064/2011/16-ब दिनांक 12.12.2011 अन्वये संबंधीत उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या अधिन राहून "जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत सादर करण्याच्या अटीवर बंधपत्र / शपथपत्र लिहून दिल्यानंतर विहीत मुदतीत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. शासन निर्णयाच्या अधिन राहून तात्पुर्ती नियुक्ती दिली जाईल. विहित मुदतीत जात वैधता प्रमाणत्र सादर न केल्यास त्याची सेवा संपुष्टात आणन्यात येऊन नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

9. अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती वगळून अन्य प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी सन 2023-2024 (दि. 31.03.2024 पर्यंत वैध असलेले) या वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्राची छायांकीत प्रत स्वाक्षांकीत करून आवेदनपत्रासोबत जोडावी. नॉन क्रिमेलिअर चे तत्व अनुसुचीत जाती / अनुसुचीत जमाती या प्रवर्गाव्यतिरिक्त अन्य सर्व मागास प्रवर्गाना लागू राहील.

10. महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी तालुक्याचा रहिवासी असल्याबाबत पुरावा सादर करावा. तसेच महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय दिनांक 04.05.2023 अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षीत पदावरती निवडीकरिता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करण्यात आलेली आहे. तसेच, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागासप्रवर्गातील महिलांकरिता आरक्षीत असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या - त्या मागासप्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहूजन कल्याण विभाग तसेंच सामान्य प्रशासनाकडुन वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

11 शुल्क (फि)

11.1 मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांनी रुपये 400/- व खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रुपये 500/- या प्रमाणे परीक्षा शुल्क तहसिलदार परभणी या नावाने राष्ट्रीयकृत बँकेचे डी.डी.(डिमांड ड्राफ्ट) अर्जासोबत सादर करावा.

(परीक्षा शुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस तसेच त्यावरील देय कर वगळून आहेत.)

12. निवड पध्दती

12.1 शासन निर्णय दिनांक 17.05.2023 नुसार लेखी परिक्षा 100 गुणांची असेल.

12.2 लेखी परिक्षा दिनांक 10.09.2023 रोजी परभणी जिल्हयात घेण्यात येईल.

12.3 गुणवत्ताक्रम हा लेखी परिक्षेत मिळालेले गुण म्हणजेच एकुण 100 पैकी मिळालेल्या गुणांच्या आधारावर असेल.

12.4 लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका इयत्ता चौथी पर्यंतच्या आभ्यासक्रमावर आधारीत वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.

12.5 लेखी परिक्षेत सामान्य ज्ञान, अंकगणित, मराठी भाषा विषय यांचा समावेष राहील.

12.6 लेखी परिक्षेत किमान 45 % गुण प्राप्त करणे बंधनकारक राहील.

12.7 कोतवाल म्हणून नेमणुक झाल्यानंतर त्यांना नेमूण दिलेल्या गावात राहून ते काम करतील असे रु.100/- चे बॉन्डवर हमीपत्र द्यावे लागेल. तसेच कोतवाल नियुक्ती झाल्यापासून परत रु.100/- बॉंडवर बंधपत्र तारण म्हणून परिछेद 4 (फ) नमुन्यात दोन जामीन द्यावे लागतील.

12.8 **कोतवाल म्हणुन नेमणुक दिल्यानंतर दिलेल्या गावात रहिवास न केल्यास कोतवाल म्हणुन दिलेली नियुक्ती कोणत्याही टप्यावर पुर्व सुचना न देता रद्द करण्यात येईल व त्याबाबत कुठलीही तक्रार ऐकुण घेण्यात येणार नाही. सदरची अट मान्य असणा-या उमेदवारांनी अर्ज सादर करावा.**

**13. अर्ज कसा करावा.**

13.1 जाहिराती सोबत प्रसिध्द करण्यात येत असलेल्या विहीत नमुण्यातील अर्ज त्यामधील तपशील/ माहिती सुस्पष्टपणे नमुद करुन सादर करावा.

13.2 अर्जासोबत स्वतःचे नाव व पत्ता नमुद केलेले 24 से.मी. x 11 से.मी. आकाराचा 30 रुपयेचे पोष्टाचे तिकिट लावलेला लिफाफा जोडावा.

13.3 उमेदवराने त्याचे आलीकडील काळातील छायाचित्र/फोटो आवेदनपत्रावर विहीत जागी स्वसाक्षांकित करून घट्ट चिकटावे.

13.4 शैक्षणिक अर्हतेच्या प्रमाणपत्राच्या स्वसाक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात.

13.5 सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी अर्जासोबत जातीच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत स्वसाक्षांकित करून जोडावी.

13.6 अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व्यतिरिक्त सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन 2023-24 या वर्षाचे नॉन क्रिमिलीअर प्रमाणपत्राची स्वसाक्षांकित प्रत अर्जा सोबत जोडावी.

13.8 रहिवासी पुरावा (रेशनकार्ड/निवडणुक ओळखपत्र/ आधारकार्ड /तहसिलदार यांनी निर्गमित केलेले रहिवासी प्रमाणपत्र) यापैकी एक रहिवासी पुरावा स्वसाक्षांकित करुन अर्जासोबत जोडावा.

13.9 वयासंबंधी दाखला (जन्माचा दाखला/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्राच्या स्वसांक्षाकित प्रती)

**14 अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख व कार्यालयाचा पत्ता.**

14.1 कोतवाल भरतीचा अर्ज तहसिल कार्यालय परभणीयेथे उपलब्ध असून त्याची किमंत 20/- रुपये आहे.

14.2 उमेदवाराने संपूर्ण भरलेला विहीत नमुन्यातील अर्ज, शैक्षणीक पात्रता प्रमाणपत्रे, जातीचे

प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे दिनांक 01.08.2023 ते 17.08.2023 या कालावधीत ( सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत (सकाळी 09.45 ते सायंकाळी 6.15 पर्यंत) तहसिल कार्यालय परभणी येथे समक्ष हजर राहून दाखल करावा:

14.3 पोष्टाने पाठविण्यात आलेले तसेच या आगोदर कोणत्याही प्रकारे सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच विहीत मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

14.4 अर्जदाराने स्वतः चा पत्ता असलेला व त्यावर रुपये 30 (अक्षरी तीस रुपये) चे तिकीट असलेला लिफाफा अर्जासोबत देणे बंधनकारक राहील ज्यामधून अर्जदार यांना लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र टपालाद्वारे पाठविण्यात येईल.

15. विहीत नमुण्यात नसलेले अर्ज, विहीत शुल्क भरणा न केलेल्या उमेदवाराचे अर्ज, विहीत शैक्षणिक अर्हता धारन न करणाऱ्या उमेदवाराचे अर्ज, अपुर्ण व चुकिचे भरलेले तसेच फोटो नसलेले, फोटो स्वसाक्षांकित न केलेले तसेच विहीत मुदती नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्या बाबत कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

16. या जाहिरातीस अनुसरुन विहीत वेळेत सादर केलेल्या अर्जाचाच विचार केला जाईल. यापुर्वी अन्य कोणत्याही संदर्भातील शासनाकडे, जिल्हाधिकारी कार्यालयास, उपविभागीय अधिकारी कार्यालयास व तहसिल कार्यालयास सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

17. प्राप्त झालेल्या अर्जाचे छाणनी अंती पात्र / अपात्र झालेल्या उमेदवारांच्या यादया तहसिल कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच www.parbhani.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील तसेच परिक्षेसाठीचे स्थळ व वेळ प्रवेशपत्राव्दारे लेखी स्वरुपात कळविण्यात येईल.

18. ज्या उमेदवारांना पोष्टाने प्रवेशपत्र प्राप्त झाले नाही अशा उमेदवारांनी दिनांक 07 व 08 सप्टेंबर, 2023 रोजी कार्यालयीन वेळेत तहसिल कार्यालय परभणीयेथून स्वतःचे ओळखपत्र व अर्ज दाखल केल्याची पोच पावती दाखवुन प्रवेशपत्र हस्तगत करावेत.

**19. उत्तरतालीका प्रसिध्दी**

19.1 दिनांक 10.09.2023 रोजी सायंकाळी 6.00 वाजता प्राथमिक उत्तर तालीका तहसिल कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच www.parbhani.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल:

19.2 प्रश्नपुस्तीका किंवा उत्तरतालीका या संबंधी कोणाचे काही आक्षेप किंवा हरकती असल्यास, दिनांक 11.09.2023 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत तहसिल कार्यालय परभणी येथे सादर करावेत.

19.3 दिनांक 11.09.2023 रोजी सायंकाळी 5.00 वाजता अंतिम उत्तर तालीका तहसिल कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय,जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच www.parbhani.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

20. लेखी परिक्षेचा निकाल व निवड झालेल्या उमेदवारांची यादी दिनांक 15.09.2023 रोजी तहसिल कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय,जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच www.parbhani.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

21 कागदपत्र पडताळणी दिनांक 20.09.2023 रोजी सकाळी 11.00 वाजता तहसिल कार्यालय, परभणी येथे होईल. ( टिपः- सत्यता पडताळणीमध्ये अर्जात नमुद केलेल्या बाबींचे प्रमाणपत्र / अभिलेख /कागदपत्रे सादर करण्यास उमेदवार असमर्थ ठरल्यास त्यास भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल व

पुढील गुणानुक्रम असणा-या उमेदवारास संधी देण्यात येईल.)

22. दिनांक 20.09.2023 रोजी अंतिम निवड यादी तहसिल कार्यालय,उपविभागीय अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच www.parbhani.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
23. काही प्रशासकिय अथवा तांत्रिक अडचण उदभवल्यास निवड प्रक्रिया स्थगीत किंवा रद्द करण्याचे अथवा सदर जाहिरातीतील कोणत्याही नियमामध्ये दुरुस्ती करण्याचे संपूर्ण अधिकार निवड समितीस राहतील.
24. उमेदवाराने निवडी संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला अपात्र ठरवून उमेदवाराची उमेदवारी भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.
25. लेखी परिक्षेस येण्याजाण्याचा खर्च उमेदवारास स्वतः करावा लागेल.

**सदस्य सचिव तथा**
**तहसिलदार परभणी**

**अध्यक्ष तथा**
**उपविभागीय अधिकारी परभणी**

प्रत

1. मा.जिल्हाधिकारी परभणी यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. वरिष्ठ तांत्रिक संचालक तथा जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, परभणी यांना parbhani.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी साठी.
3. जिल्हा माहिती अधिकारी यांना तालुकास्तरावरील **(दोन)** वर्तमान पत्रात प्रसिध्दी साठी.
4. गट विकास अधिकारी, पंचायत समिती परभणी यांना त्यांच्या नोटीस बोर्डवर व तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कार्यालयावर डकवुन पंचनामा सादर करणे.
5. मुख्याधिकारी, नगर पिलका परभणी यांना त्यांच्या नोटीस बोर्डवर डकवुन पंचानामा सादर करणे.
6. सर्व तलाठी तालुका परभणी यांनी आपल्या सज्जावर व सज्जा अंतर्गत प्रत्येक गावात डकवुन पंचनामा सादर करणे.
7. परभणी शिपाई, तहसिल कार्यालय परभणी यांनी या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर डकवुन पंचानामा सादर करावा.

**सदस्य सचिव तथा**
**तहसिलदार परभणी**

**अध्यक्ष तथा**
**उपविभागीय अधिकारी परभणी**